# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** म.न.पा. च्या अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाकरीता १
**{ अग्निशमन विभाग }** नग १२००० लि. पाणी व १००० लि. फोम क्षमतेचे फोम टेंडर चेसीससह रु. १,५५,७६,०००/- (सर्व करासहित) राशीमध्ये फेब्रिकेशन कार्य करुन खरेदी करण्याच्या विषयांस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

(सदर खर्च अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाच्या पद क्र. A४२६००३७१०३३ अंतर्गत करण्यात येईल.)

**टिप** :- सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक** :- 397/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :- 19/11/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन व आपत्काली सेवा विभागयांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार म.न.पा. च्या अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाकरीता १ नग १२००० लि. पाणी व १००० लि. फोम क्षमतेचे फोम टेंडर चेसीससह रु. १,५५,७६,०००/- (सर्व करासहित) राशीमध्ये फेब्रिकेशन कार्य करुन खरेदी करणे तसेच सदर खर्च अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाच्या पद क्र. A४२६००३७१०३३ अंतर्गत करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**